प्रादेशिक अधिकारी, मऔविम, सोलापूर कार्यालय कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई- ९३

दुरध्वनी क्रमांक -०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ / ४७४८४६७९

email-adminofficer@midcindia.org

क्र.मऔविम/ साप्रवि/प्रा.अ. सोलापूर/ P310419 /२०२४, दिनांक:- 06 SEP 2024

**कार्यालयीन आदेश :-**

महामंडळाचा कार्यालयीन आदेश क्र. पी-२९४८९३, दिनांक १३/०८/२०२४ अन्वये नव्याने मान्यता देण्यात आलेली ७ प्रादेशिक कार्यालये कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर हे कार्यालय कार्यान्वित करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली तसेच प्रादेशिक कार्यालय, मऔविम सोलापूर या कार्यालयाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | कार्यालयाची कार्यकक्षा |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक कार्यालय, सांगली | सांगली या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे, तसेच सदर जिल्ह्यातील सर्व भूसंपादनाची कामे |
| २ | प्रादेशिक कार्यालय, सोलापूर | सोलापूर या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे, तसेच सदर जिल्ह्यातील सर्व भूसंपादनाची कामे |

तसेच महामंडळाचे दिनांक १३/०८/२०२४ रोजीचे कार्यालयीन आदेशाचे अनुषंगाने या आदेशाचे दिनांकापासून प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली यांनी सांगली जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांचे कामकाज पहावे आणि प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांचे कामकाज पहावे.

२) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली अंतर्गत क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर हे कार्यालय या आदेशाचे दिनांकापासून रद्द करण्यात येऊन सदरचे कार्यालय हे प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर असे संबोधित करण्यात यावे.

३) क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय, मऔविम, सोलापूर येथे खालील नमूद कार्यरत अधिकारी/ कर्मचारी हे या आदेशाचे दिनांकापासून प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर या कार्यालयात कार्यरत राहतील.

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्री. जी. एस. कोळेकर, क्षेत्र व्यवस्थापक |
| २ | कु. जे. पी. पवार, सहायक क्षेत्र व्यवस्थापक |
| ३ | श्री. सतिश शिंदे, सहाय्यक |

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| ४ | श्री. प्रदिप अंत्रेटी, सहायक |
| ५ | श्री. आरिफ पठाण, प्रमुख भूमापक (सेवावर्ग) |
| ६ | श्री. भरत भांजी, भूमापक |
| ७ | श्री. सतिश पाटील, लिपिक-टंकलेखक (रुपांतरीत अस्थाई आस्थापना) |
| ८ | श्री. एम. ए. धसाड, शिपाई (रु.अ.आ.) |

उपरोक्त नमूद अधिकारी / कर्मचारी यांचे व्यतिरिक्त कार्यरत इतर सर्व अधिकारी / कर्मचारी हे प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली येथे कार्यरत राहतील.

खालील नमूद कर्मचारी यांची क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर येथे नेमणूक करण्यात आली होती. सद्यस्थितीत प्रादेशिक कार्यालय, सोलापूर येथे मंजूर आकृतीबंधानुसार अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक झाल्याने, सदर कर्मचा-यांची सेवा प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली येथे या आदेशाच्या दिनांकापासून नियमित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्री. व्ही. एस. बुवा, सहायक क्षेत्र व्यवस्थापक |
| २ | श्री. पवन घनश्याम बोबडे, प्रमुख भूमापक |

४) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांशी सबंधीत सर्व नस्ती व इतर सर्व प्रकारची कागदपत्रे प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर यांचेकडे हस्तांतर करावेत.

५) प्रादेशिक कार्यालय, सोलापूर हे कार्यालय या आदेशाच्या दिनांकापासून प्रादेशिक कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत होईल याबाबतची सर्व जबाबदारी संबधित प्रादेशिक अधिकारी तसेच मुख्य अभियंता, पुणे यांची राहील.

६) महामंडळाच्या दिनांक १३/०८/२०२४ चे कार्यालयीन आदेशान्वये आवश्यक ती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत देण्यात आलेल्या सूचना कायम राहतील.

सदर आदेश मा.सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(तुषार मठकर)
**महाव्यवस्थापक (मबवि)**
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई.
- मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन/विदर्भ), मऔविम, मुंबई.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता :-**

- सर्व विभाग प्रमुख / कार्यालयीन प्रमुख, मऔविम.
- मुख्य अभियंता, मऔविम, पुणे.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सोलापूर.
- सुरक्षित नस्ती/कार्यालयीन आदेश नस्ती/वैयक्तीक नस्ती.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in